सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तांशिस/प्राकाना/शैवि-1/ 2020/ 1409 दिनांक:- 08 JUL 2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमात प्रवेशाच्या वेळी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्राबाबत सुचना

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची पत्र क्र. २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/2020/178, दि. 03 जुलै 2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमात प्रवेशाच्या वेळी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्राबाबत संदर्भिय पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी प्रवेशासंबंधी सुचना निर्गमित केल्या आहेत, त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन करावे.

:- संदर्भिय सुचना

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०२०/ ९५८

दिनांक : 03 JUL 2020

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे**

...शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस. एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी.औषधनिर्माणशास्त्र,एच.एम.सी.टी.,सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र, बी. प्लॅनिंग पदवी अभ्यासक्रम (Under Graduate), प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक.,एम.फार्म.,फार्म.डी.,फार्म.डी.(Post Baccalaureate) एम. आर्किटेक्चर,एम.प्लॅनिंग, एम.एचएमसीटी , एमबीए/एमएमएस ,एमसीए हे पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करतांना प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१) जात /जमात प्रमाणपत्र ( Caste /Tribe Certificate )(महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )

२) जात/जमात वैधता प्रमाणपत्र (Caste / Tribe Validity Certificate ) (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले ).

टिप : १० वी व १२ वी नंतरच्या पदविका प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक नाही . (मात्र प्रथम वर्ष पदविका किंवा द्वितीय वर्षातील पदविका अभ्यासक्रमाच्या राखीव जागेवर प्रवेश मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने प्रवेश मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत जात/ जमात प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी संबंधित जात / जमात पडताळणी समितीकडे योग्य भरलेला अर्ज सादर करावा लागेल.)

३) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र **(Non- Creamy Layer Certificate)** ( दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध ) (अनूसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ) [राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांचा अधिवास महाराष्ट्र राज्यात असला तरी महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या आरक्षणाचे धोरण त्यांना लागु नाही.]

४) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)

५) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate) - TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले .

६) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गासाठी (EWS) विहीत केलेल्या प्रपत्रात सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

७) अपंगत्वाचे प्रमाणपत्र (Person with Disability) (आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

८) सैन्य दलातील/(Defence) संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

९) अल्पसंख्यांकासाठी (Minority) संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

१०) आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

<u>इशारा :</u> शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये काही उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात / जमात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्रे /अपंगत्वाचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही,सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची प्रमाणपत्रे सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचेविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. प्रवेशोच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका-याकडूनच प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत. बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वेगवेगळ्या वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणा-या प्रमाणपत्रांची तपशीलवार माहिती प्रवेश पुस्तिकेत अंतर्भुत असते. त्याचा तपशील संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या http://www.mahacet.org तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या http://www.maha-ara.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीसाठी सादर

१. मा.सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, वरील सूचना आपल्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावी. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्र.१०, मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी.
३. कार्यासन क्रमांक ३ यांना माहितीसाठी व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.